डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५७१२, जि. रत्नागिरी

# कोकण कन्याळ





अधिक माहितीसाठी

प्रमुख, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग

कृषि महाविद्यालय, दापोली ४१५७१२

जि. रत्नागिरी

# कोकण कन्याळ

(Accession Number: INDIA _GOAT_1100_KONKAN KANYAL_060022)

**उगमस्थान** : कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा, महाराष्ट्र राज्य
**उपयुक्तता** : मांसासाठी



| | | | |
|---|---|---|---|
| **बाहयगुण वैशिष्टये** : | **रंग** | : | काळा असून चेहऱ्यावर दोन्ही बाजूस पांढरा पट्टा असतो तसेच पोटावर आणि पायावर गुडघ्यापर्यंत पांढरा रंग |
| | **शरीर** | : | मध्यम आकार व काटक शरीरयष्टी |
| | **डोके** | : | काळा रंग असून चेहऱ्यावर शिंगापासून नाकपुडीपर्यंत दोन्ही बाजूस पांढरा पट्टा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शिंगे | : | गोल, टोकदार व मागे वळलेली |
| | | कान | : | मध्यम असून लोंबकळणारे असतात तसेच कानाची किनार पांढऱ्या रंगाची |
| | | कास | : | मध्यम आकाराची |
| | | शेपटी | : | आतिल बाजूस पांढऱ्या रंगाची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वजन | : | वय | नर | मादी |
| | | जन्मत: | २.२३ किलो | २.०५ किलो |
| | | १२ महिने वय | २५.२६ किलो | २१.०० किलो |
| | | पूर्ण वाढ झालेले | ५५.९९ किलो | ३२.०० किलो |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उत्पादन गुण वैशिष्टये | : | प्रथम रेतनाचे वय | : | ३२९.२५ दिवस |
| | | प्रथम वेताचे वय | : | ५०७.६७ दिवस |
| | | प्रथम वेताचे वजन | : | २४.५० किलो |
| | | दुधाचा कालावधी | : | ९६.९७ दिवस |
| | | दुध उत्पादन | : | ०.७० ते १.१० लिटर/दिवस |
| | | दोन वेतातील अंतर | : | २३९.८५ दिवस |
| | | गाभण काळ | : | १४७.५२ दिवस |
| | | जुळयाचे प्रमाण | : | ४०.८५ टक्के |
| | | मांसाचा उतारा | : | ५३.३७ टक्के |

ही जात शरीराने काटक असून खूर टणक आणि उंच असलेले गुणधर्म असल्यामुळे कोकणातील अति पावसाच्या प्रदेशासाठी योग्य अशी जात आहे.

## कोकण कन्याळ — शेळीपालकांना वरदान

पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला सहयाद्रीच्या उत्तुंग रांगा, उत्तरेला गुजरात तर दक्षिणेला गोवा राज्य या भौगोलिक सीमांमध्ये ७२० किमी लांब आणि ५०ते ६० किमी रूंद असा महाराष्ट्रातील कोकण विभाग आहे. या कोकण विभागाचे भौगोलिक क्षेत्र २९.७९ लाख हेक्टर आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी हवामान उष्ण—दमट आहे. कोकणचे सरासरी जास्तीत जास्त तापमान २५° ते ३५° सेल्सिअस तर कमीत कमी तापमान २५° ते २७° सेल्सिअस असून आर्द्रता ८०टक्के आहे. सरासरी पर्जन्यमान ३००० ते ३५०० मिमी असून पर्जन्यमानाचा कालावधी बहुतांशी जून ते सप्टेंबर असा असतो. अत्यल्प पर्जन्यमानाचा हंगाम ऑक्टोबर—नोव्हेंबर असतो. पावसाळी हंगामात आर्द्रतेचे प्रमाण ९० ते ९८ टक्के इतके असते. सर्वसाधारणपणे मे महिना हा उष्ण

हवामानाचा असून सरासरी उच्चतम तापमान ३३° सेल्सिअस जवळपास असते. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, घरातील महिलांचा शेतीमधील सहभाग, खाद्याचे उपलब्ध स्त्रोत त्याबरोबरच शेळी पैदास आणि मटणासाठी बाजारातील मोठया प्रमाणात मागणी यासाठी शेळी पालन या व्यवसायास कोकण भागात अनन्यसाधारण महत्व आहे.

कोकणातील अतिपर्जन्यमान व उष्ण—दमट हवामानाच्या भूप्रदेशासाठी योग्य अशी स्थानिक शेळयांच्या कळपातून सर्वेक्षण करून निश्चित केलेल्या गुणधर्माच्या आधारे अधिक उत्पादन क्षमतेसाठी निवडलेल्या शेळयांमध्ये सुधारणा करून कोकण कन्याळ ही नविन सुधारीत जात डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने २०१० साली प्रसारित केली. या शेळीच्या जातीची नोंद राष्ट्रीय अनुवंषिक संसाधन ब्यूरो, कर्नाल यांचेकडे इंडिया गोट ११०० —कोकण कन्याळ— ०६०२२ अशी बावीसाव्या अनुक्रमाने करण्यात आली आहे. या जातीच्या पैदाशीचा स्त्रोत दक्षिण कोकण आहे. कोकणामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने सिंधुदूर्ग जिल्हात पशुपैदास क्षेत्र, निळेली, रत्नागिरी जिल्हात कृषि तंत्र विद्यालय, लांजा, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग, दापोली आणि मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली तसेच रायगड जिल्हात कृषि विज्ञान केंद्र, रोहा येथे कोकण कन्याळ शेळीची पैदास केंद्रे स्थापन केलेली आहेत.

ही जात कोकणातील भूमिहीन, अल्पभूधारक, सुशिक्षित बेरोजगार वर्गामध्ये लोकप्रिय झाली आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने आपल्या पैदास केंद्रावरून १३५० शेळया आणि बोकडांची विक्री केलेली आहे. या जातीला कोकणात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये शेळीपालन व्यवसायासाठी मोठया प्रमाणावर मागणी आहे. विद्यापीठाकडून आगावू नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्यक्रमाने प्रशिक्षित करून शेळयांचा पुरवठा करण्यात येत आहे.

**शारिरीक गुणधर्माची वैशिष्टये:**

- ही जात स्थानिक शेळयांपेक्षा चांगलीच उंच, शरीराने काटक असून आकाराने मोठी आहे.
- कान लांब, लोंबकळणारे, चपटे आणि काळया रंगासह पांढरी किनार असणारे आहेत.

- चेहरा, मान आणि कानावर काळया रंगासह पांढरी किनार असते.
- डोक्यावर नाकपुडयांपासून कानापर्यंत दोन्ही बाजूंनी काळया रंगासह पांढरी किनार असते.
- कपाळ पसरट आणि रूंद असते.
- शिंगे गोल टोकदार मागे वळलेली, मान लांब व तोंडापासून शेपटीपर्यंत शरीराचा जास्त लांबपणा असतो.
- शेपटीवरील बाजूने काळी आणि खालील बाजूने पांढरी असते.
- मादीचा बांध मोठा असल्यामुळे एकापेक्षा जास्त करडे (गर्भ) गर्भाशयात जोपासण्याची क्षमता आहे. नर बोकड उंच, छाती भरदार, शरीराचा मागील भाग जास्त मोठा व उंच असलेला आहे.
- या शेळी जातीच्या परिपक्व नराची सरासरी उंची ८७.२ सें.मी. आणि मादीची ६९.६सें.मी. असून, छातीचा घेर नरामध्ये ८७.८ सें.मी. तर मादीमध्ये ७३.८सें.मी. आहे. शरीराची लांबी नरामध्ये ८३ सें.मी. व मादीमध्ये ७२.८ सें.मी. आहे.
- डोंगर—दऱ्याच्या प्रदेशात चरावयास चालण्यासाठी आवश्यक असे मजबूत व काटक पाय, टणक व उंच खूर असे विशिष्ट गुणधर्म असलेली कोकणातील डोंगर दऱ्याच्या प्रदेशास योग्य अशी ही जात आहे.

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने शेळीपालनासाठी दिलेल्या शिफारशी:**

**शिफारस क्र.१—**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कोकण कन्याळ शेळीच्या जातीच्या मांस उत्पादनासाठी कोकणात संगोपन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**शिफारस क्र.२—**

कोकण कन्याळ नरांच्या वजनात अधिक वाढ होण्यासाठी बंदिस्त संगोपन पध्दतीची शिफारस करण्यात येत आहे.

**शिफारस क्र.३—**

कोकण कन्याळ जातीच्या करडांची दुधाची गरज भागवण्यासाठी एकूण दुधाच्या गरजेपैकी ५० टक्के सोयाबीनचे दुध पाजण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**शिफारस क्र.४—**

कोकण कन्याळ करडांच्या वाढीसाठी पुरक खाद्यामध्ये २०टक्के अझोला पावडर समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**शिफारस क्र.५—**

बोकडाच्या मांसातील स्नायु मऊ करणे आणि सहा दिवसांपर्यंत संरक्षित करण्यासाठी विडयाच्या पानांचा काढा १:१ या प्रमाणात ३० मिनिटे प्रक्रिया करून १०—१५ अंश सेल्सिअस तापमानाला ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.